SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004
MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

संदर्भ क्र. शिवाजी वि/संलग्नता/टी-२/शासन टे./ No 1 5 0 7 दि. 28 SEP 2026

# परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये/मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :- सन २०२७-२८ या शैक्षणिक वर्षासाठी नवीन महाविद्यालय व नवीन विद्याशाखांसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत...**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून **New College Permission System (NCPS)** या ऑनलाईन प्रणालीमार्फत नवीन महाविद्यालय व नवीन विद्याशाखा इ. सुरु करण्यासंदर्भातील प्रस्तावांबाबत विद्यापीठाच्या **www.unishivaji.ac.in** या संकेतस्थळावरील Affiliation → Affiliation T-2 → Information Lists या लिंकवर विद्यापीठाची विस्तृत जाहिरात, शासन निर्णय, शासन पत्र व वार्षिक बृहत आराखडा मान्यता प्राप्त स्थळ बिंदुची यादी ठेवण्यात आलेली आहे. तसेच सदरचे प्रस्ताव **New College Permission System (NCPS) https://htedu.maharashtra.gov.in/NCPS** या ऑनलाईन प्रणालीमार्फत **दि. ३० सप्टेंबर, २०२६** पर्यंत प्रस्ताव स्विकारले जातील.

त्याअनुषंगाने सदरचे प्रस्ताव मागविण्यासाठीची कार्यपध्दती www.unishivaji.ac.in या विद्यापीठ संकेतस्थळावरील Affiliation → Affiliation T-2 Circular / Information Lists मध्ये उपलब्ध आहे.

तेव्हा सदर कार्यपध्दतीनुसार आपण प्रस्ताव सादर करावेत. ही विनंती.
कळावे.

आपला विश्वासू,

श्री दिपक द. अडगळे
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

D:\NTW & BSP\Shasan T. 2026\Circular 2025.Docx

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## जाहिरात

शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून New College Permission System (NCPS) या ऑनलाईन प्रणालीमार्फत नवीन महाविद्यालय व नवीन विद्याशाखा इ. सुरु करण्यासंदर्भातील प्रस्तावांबाबत विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरील Affiliation → Affiliation T-२ → Information Lists या लिंकवर विद्यापीठाची विस्तृत जाहिरात, शासन निर्णय, शासन पत्र व वार्षिक बृहत आराखडा मान्यता प्राप्त स्थळ बिंदुची यादी, तसेच सदरचे प्रस्ताव New College Permission System (NCPS) https://htedu.maharashtra.gov.in/NCPS या ऑनलाईन प्रणालीमार्फत संस्थेने/महाविद्यालयाने विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करणेबाबतचे पत्र ठेवण्यात आलेले आहे.

**त्यास अनुसरून शासन मान्यतेच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२७-२८ च्या वार्षिक बृहत आराखड्यानुसार व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ मधील तरतुदीनुसार शैक्षणिक संस्था, संलग्न महाविद्यालये यांनी दि.३०.०९.२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी New College Permission System (NCPS) या ऑनलाईन प्रणालीमार्फतच विद्यापीठ कार्यालयीन वेळेतच प्रस्ताव ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.**

तसेच भारतीय विधिज्ञ परिषदेने दि.०५.०३.२०२६ रोजीच्या नोटीफीकेशन व्दारे ०३ वर्षाचा मोराटोरिअमचा कालावधी रद्द केलेला आहे. त्यामुळे विधी महाविद्यालयांसाठी दि.१८.०९.२०२५ शासन निर्णयामधील तरतुदीनुसार NCPS या ऑनलाईन प्रणालीव्दारे प्रस्ताव सादर करावेत.

**उपरोक्त शासन पत्राच्या अनुषंगाने पोष्टामार्फत किंवा अन्य तत्सम सुविधांमार्फत पाठविलेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.**

प्रथम शुल्क बँकेत जमा करुन प्रस्ताव दि.३०/०९/२०२६ नंतर सादर करता येणार नाही. शुल्क व ऑनलाईन भरलेल्या प्रस्तावाची प्रत एकाचवेळी या कार्यालयास दि.३०/०९/२०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. पोष्टामार्फत किंवा अन्य तत्सम सुविधांमार्फत पाठविलेले प्रस्ताव तसेच विलंबाने पोहोच होणारे प्रस्ताव व शुल्क यावर कार्यवाही केली जाणार नाही.

**टिप :- शासनाकडून मंजूर केलेल्या स्थळ बिंदूनुसारच संस्था/ महाविद्यालयांनी ऑनलाईन (Online) अर्ज भरावेत.**

सही/-
डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

क्र.शिवाजीवि/संलग्नता/टी-२/१५०४
दिनांक : २९.०९.२०२६